# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय

## जाहिर प्रकटन क्रमांक ०७/२०२०-२१

**मान्सुनपुर्व तयारी २०२०-२१ अनुषंगाने नियोजित मनपाच्या निवारा केंद्रामध्ये स्थलांतरीत व्यक्तींसाठी दुध, बिस्कीटे, मिल्क पावडर व शुध्द बाटली बंद पिण्याचे पाणी पुरविणे** तसेच **मान्सुनपुर्व तयारी २०२०-२१ अनुषंगाने नियोजित मनपाच्या निवारा केंद्रामध्ये स्थलांतरीत व्यक्तींसाठी चहा, नाष्टा, भोजन व पिण्याचे पाणी पुरविणे** कामी **तत्सम कामाचा अनुभव असलेल्या** सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग मुख्यालयामार्फत **खुले प्रवर्गातील** मक्तेदार यांचेकडून खालील नमुद कामांसाठी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या www.smkc.gov.in या वेबसाईट द्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | बाब क्र. | कामाचे नांव | परिमाण | निविदा फॉर्म फी र.रु. | कामाची मुदत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | **खुला प्रवर्ग करीता** | | | | |
| | १ | **शुध्द मिनरलयुक्त पाणी बॉटल-** | **१ लिटर बॉटल्स** | ७५०/- | ४ महीने | १५००/- |
| | २ | **दुध** | १०० ग्रॅम पाऊच | | | |
| | ३ | दुध (मिल्क) पावडर | १०० ग्रॅम पाऊच | | | |
| | ४ | बिस्कीटे गोड (पारले-जी) | १०० ते १२५ ग्रॅम पुडे | | | |
| | | बिस्कीटे खारी (पारले-मोनॅको) | १०० ते १२५ ग्रॅम पुडे | | | |

| अ. क्र. | बाब क्र. | कामाचे नांव | परिमाण | निविदा फॉर्म फी र.रु. | कामाची मुदत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | | **खुला प्रवर्ग करीता** | | | | |
| | १ | **चहा** | **८० मी.ली.** | ७५०/- | ४ महीने | १५००/- |
| | २ | **नाष्टा -** | | | | |
| | | रवा उपमा, शिरा, पोहे या पैकी एक | १५० ग्रॅम | | | |
| | ३ | **जेवण — (दुपारचे)** | | | | |
| | | पुरी /चपाती /भाकरी यापैकी कोणतेही | पुरेसे / पोटभर | | | |
| | | सुकी भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | | | |
| | | रस भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | | | |
| | | भात (शिजवलेला) | पुरेसे / पोटभर | | | |
| | | **जेवण — (रात्रीचे)** | | | | |
| | | पुरी /चपाती /भाकरी यापैकी कोणतेही | पुरेसे / पोटभर | | | |
| | | सुकी भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | | | |
| | | रस भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | | | |
| | | व्हेज पुलाव /भात (शिजवलेला) यापैकी कोणतेही एक | पुरेसे / पोटभर | | | |

**टिप :-**

१. निविदा फॉर्म मिळण्याचे व सादर करणेचे ठिकाण www.smkc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहिल.

२. संपुर्ण निविदा प्रक्रिया, अर्ज विक्री सादरीकरण व स्विकृत्ती E- Tender System द्वारे कार्यरत राहील.

३.निविदेबाबत अधिक माहिती खालील प्रमाणे आहे.

**काम क्र. १ साठी**

i) निविदा विक्री व स्विकारणे - निवीदा ऑनलाईन प्रसिध्दीपासून **दिनांक २९/०५/२०२०,** दुपारी ०४.०० वाजेपर्यत राहील.

ii) निविदा उघडणे- **दिनांक ०१/०६/२०२०,** रोजी दुपारी ०४.०० वाजता निविदा कमिटी समोर उघडणेत येतील.

४. मक्तेदारास सदर कामासाठी असणाऱ्या निविदा शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

५. मक्तेदारांनी पुरवठा करावयाचे साहित्य चांगल्या व योग्य दर्जाचे देणेचे आहे. नापसंत केलेला साहित्य परत घेवून त्याऐवजी योग्य दर्जाचे साहित्य मक्तेदाराने स्वखर्चाने महानगरपालिकेकडे पूर्तता करणेची आहे.

६. मक्तेदार यांनी महानगरपालिकेच्या विभाग प्रमुख यांच्या पुर्व परवानगी शिवाय कोणतेही साहित्य परस्पर कोणत्याही केंद्रावर देणेचे नाही.

७. मक्तेदाराने उपरोक्त नमुद केलेले साहित्य मनपाचे निवारा केंद्रावर मनपाने सुचविलेनुसार व संख्ये इतके स्वत:च्या वाहनाने मुदतीत पुरविणेचे आहे.

Sd/-

**आयुक्त**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

जा.क्र.मनपा/सा/बांधवि/ [illegible] /२०२०-२१ दि. [illegible]/५/२०२०

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय
## निविदा अटी व शर्ती (जाहिर प्रकटन क्रमांक 07/2020-21)

१. **निवीदा E-Tender पध्दतीने** सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या www.smkc.gov.in या वेबसाईट द्वारे **संकेत स्थळावर ऑनलाईन देणेचे आहेत.**

२. i) कामासाठी बयाणा रक्कम रु.१५००/- राहील. बयाणा रक्कम www.smkc.gov.in द्वारे online भरणेची आहे.

iii) **या निविदा बाबतच्या निविदा अटी व शर्ती** www.smkc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. त्यामधील सर्व अटी व शर्ती मक्तेदारास बंधनकारक राहतील.

iv) उक्त कामाच्या निविदा शर्ती व अटी स्वाक्षरी करुन पहील्या लिफाफ्या सोबत सादर करणेचे आहे.

३. मक्तेदारांनी पुरवठा करावयाचे साहित्य चांगल्या व योग्य दर्जाचे देणेचे आहे. नापसंत केलेला साहित्य परत घेवून त्याऐवजी योग्य दर्जाचे साहित्य मक्तेदाराने स्वखर्चाने महानगरपालिकेकडे पूर्तता करणेची आहे.

४. **मक्तेदार यांनी** महानगरपालिकेच्या विभाग प्रमुख यांच्या **पुर्व परवानगी** शिवाय कोणतेही साहित्य परस्पर कोणत्याही केंद्रावर देणेचे नाही.

५. मक्तेदाराने निविदे मधील नमुद केलेले साहित्य मनपाचे निवारा केंद्रावर मनपाने सुचविलेनुसार व संख्ये इतके स्वत:च्या वाहनाने मुदतीत पुरविणेचे आहे.

६. कोणतीही निविदा मंजूर / ना मंजूर करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.

७. सदर निविदेच्या अटी व शर्ती मध्ये सुधारणा करणे, अटी शर्ती वाढविणे / कमी करणेचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

८. निविदा फॉर्मच्या अनुषंगाने अंदाजपत्रके / इतर माहितीसाठी मक्तेदार / पुरवठादार यांनी संबंधीत विभाग प्रमुंखाकडून माहिती घेणेची आहे.

**प्रमुख अटी व शर्ती:-**

**१) उपरोक्त तक्त्यात नमुद करण्यात आलेल्या चहा, नाष्टा व पुरेसे शुध्द पिण्याचे पाणी पुरविण्यासह दर देण्याचे आहेत.**

**२) चहा, नाष्टा, जेवण, पाणी इत्यादी निवारा केंद्रामध्ये किंवा निवारा केंद्राच्या जवळच्या परिसरात स्वतंत्र जागेत तयार करुन ते निवारा केंद्रात पुरविण्याचे आहेत. त्यासाठी लागणारे सर्व साहित्य व मनुष्य बळ, वाहतुक स्वत:चे वापरणेचे आहे.**

**३) तयार करुन पुरविण्यात येणारे नाष्टा व भोजनातील पदार्थ/भाज्या या कार्यालयाचे संबंधीत विभाग प्रमुख यांनी सुचविल्यानुसार वेळो-वेळी बदल करुन पुरविण्याचे आहेत.**

**४) तयार केलेले खाद्य पदार्थ शासनाचे अन्न व औषध प्रशासनाकडून वेळो-वेळी तपासण्यात येतील त्या तपासणीत तृटी आढळल्यास होणा-या परिणामाची सर्व जबाबदारी भोजन पुरवठादाराची राहिल.**

**५) शासनाचे अन्न व औषध प्रशासनाचे अभिप्रायानुसार आवश्यक तृटींची व अन्य आवश्यक त्या सुचनांची पुर्तता करणेची जबाबदारी भोजन पुरवठादार यांची राहिल.**

**६) भोजन तयार करण्यासाठी लागणारे सर्व साहित्य, विद्युत पुरवठा, शुध्द पाणी पुरवठयाची किंवा बंदीस्त मंडपाची सोय मंजुर ठेकेदार यांनी स्व: खर्चाने करणेची आहे.**

**७) पुरवावयाचे मालाचे तपशिलात नमुद केलेल्या सर्व बाब निहाय खाद्य वस्तुंचे एकत्रित दराची कमी/जादा टक्केवारीच्या निकषावर मंजूर करण्यात येईल. सदर निविदा दर मंजूर अथवा ना मंजूर करणेचे अधिकार मा. आयुक्तसो यांचे राहतील.**

**८) संबंधीत मक्तेदाराने यापुर्वी मनपाकडे भोजन पुरविण्याबाबतचे कामाचे दाखले/वर्क ऑर्डर जोडणे आवश्यक आहे.**

**९) संबंधीत मक्तेदार स्थानिक असणे आवश्यक आहे.**

१०.वरील कामासाठी अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या साठयाचा पुरवठा ठरवून दिलेल्या वर्णनानुसार/दरानुसार करणे बंधनकारक राहील.

११. इमारत व दळणवळण विभागाचे / कामागार कायदा / रॉयल्टी वैगेरे तरतूदी बंधनकारक राहतील.

१२. अंदाजपत्रकामधील प्रत्येक बार्बीचे एकूण प्रमाण / कॉन्टीटी अंदाजीत आहेत: प्रत्यक्ष केलेल्या कामाच्या मापावर बिले केली जातील.

१३. बदल केलेले किंवा वाढ केलेले काम मक्तेदाराने भरलेल्या दराप्रमाणेच करणेचे आहे.

१४. बदल केलेल किंवा वाढ केलेले कामाबद्दलच्या बाबी अंदाजपत्रकामध्ये नसेल तर मा.आयुक्त यांच्या मान्यतेचे दर ठरविले जातील असे ठरविलेला दर मंजूर दराने यादीतील असलेले दरापेक्षा जास्त असता कामा नये. मात्र ज्या दराप्रमाणे टेंडर मंजूर झाले आहेत. त्या दराने आकारणी करण्यात येईल.

१५. बदल केलेल्या किंवा वाढ केलेल्या कामामुळे दिलेल्या मुळ मुदतीपेक्षा जादा मुदत लागल्यास मा.आयुक्त यांच्या सल्याने मंजूर करणेत येईल.

१६. **मक्तेदार यांनी त्यांना मंजूर असलेले कामाची कामास दिलेल्या मुदतीचे प्रमाणामध्ये प्रगती झाली नाही किंवा काम समाधानकारक अथवा वेळेत पुर्ण केले नाही अगर** मक्तेदार आपणास नादार ठरवून घेणाचा कोर्टमार्फत अगर अन्य रितीने प्रयत्न करील अथवा आपल्या धनकोशी तशा प्रकारे संगणमत करील असे दिसून आल्यास **सदर मक्तेदाराकडून काम काढून घेतले जाईल / कॉन्ट्रक्ट रद्द केला जाईल व राहिलेल्या कामाबद्दल टेंडर मागवून अगर अन्य रितीने ते काम पूरे केल्यास जो जादा खर्च येईल तो मुळ मक्तेदाराच्या बिलातून अगर त्यांचे स्थावर मालमत्तेतून वसूल केले जाईल. व मुळ मक्तेदार यांचे नांव काळया यादीत समाविष्ठ केले जाईल.**

१८. कोणत्याही कारणासाठी मनपाचे परवानगी शिवाय मक्तेदारास यादीतील काम दुसऱ्यास तबदील करता येणार नाही.

१९. एखाद्या फर्मच्या भागीदारीचे टेंडर दिली असल्यास फर्मच्या घटनेतील कोणताही बदल ताबडतोब मक्तेदार याने महापालिकेस कळविले पाहीजेत.

२०.कामावर एखाद्या इसमास दुखापत किंवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी मक्तेदारावर राहील.

२१. वर्कमेन कॉम्पेन्सेशन्स ऍक्टखाली जर महापालिकेवर जबाबदारी बसली तर त्या जबाबदारीची रक्कम मक्तेदाराकडून वसुल केली जाईल.

२२. कामावर लावलेल्या मजुरांची यादी महानगरपालिकेने मागितलेस ती मक्तेदाराने दिली पाहिजे.

२३. कामास आरंभ करण्यास विलंब लागल्यास त्याबद्दल मक्तेदारास मोबदला मिळणार नाही.

२४.महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मुदतीत काम टप्याटप्याच्या गतीने झाले नाही तर दंडाची आकारणी मनपाच्या सक्षम अधिकारी यांनी ठरविल्याप्रमाणे केली जाईल व ती रक्कम बिलातून कापुन घेतली जाईल.

२५. कार्यारंभ आदेश देऊन मुदतीत काम सरु न केल्यास प्रतिदिन रुपये १०००/- या प्रमाणे दंडाची आकारणी करणेत येईल.

२६. मिनिमम वेजेस ऍक्ट प्रमाणे कायदयाने जबाबदारी मक्तेदारावर राहील. त्यास महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

२७. एखाद्या फर्म कडून जेव्हा टेंडर दिले जाते तेव्हा ते फर्मच्या प्रत्येक भागीदाराने सही करुन दिले पाहिजे परंतू एखादा भागीदार हजर नसेल त्यावेळी त्यांच्या तर्फे अधिकार पत्र (अँथोरिटी) असलेल्या दुसऱ्या कोणत्याही इसमास सही करुन देता येईल.

२८. टेंडर दिलेनंतर त्या बाबत कसलाही खुलासा किंवा सबब ऐकली जाणार नाही. व त्याचा विचारही केला जाणार नाही.

२९.टेंडर मधील करावयाचे कामाचे दर ऑनलाईन भरणेचे असून ते शब्दात तसेच आकडयात दिले पाहिजेत. अटी नमुद केलेले, सही नसलेली अगर नियमास अनुसरुन नसलेले टेंडर विचारात घेतले जाणार नाहीत.

३०.मक्तेदाराने महानगरपालिकेच्या कामासाठी बाहेरुन आणलेल्या मालावर संबंधीत कर माफी दिली जाणार नाही.

**३१. ठेकेदाराने निविदेसोबत त्यांनी सादर केलेल्या (Uploaded) सर्व कागदपत्रांच्या सत्यते विषयी प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. (सोबत नमुना प्रतिज्ञापत्र) सादर केला आहे. सदरची माहिती खोटी अथवा चुकीची आढळयास ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करणेत येईल. व सदर कागदपत्रांसाठी महानगरपालिका अथवा कोणताही अधिकारी व कर्मचारी जबाबदार असणार नाही.**

**३२. ठेकेदाराने स्वत:च्या नावाचा/फर्मचा पत्रव्यवहाराचा पत्ता, फोन नंबर, मोबाईल नंबर, मेल आय.डी. देणे बंधनकारक आहे. मेल आय.डी. द्वारे केलेले पत्रव्यवहार आपलेवर बंधनकारक राहतील.**

**३३.शासनाकडून वेळोवेळी प्रसिध्द झालेले व होणारे शासन निर्णय व परिपत्रक / आदेश या निविदेमधील कामांना लागू करणेचे अधिकार मा. आयुक्तसो यांना राहतील.**

**३४. मक्तेदारानी कोणत्याही परिस्थितीत जून्या कामांची ताळमेळ घालता येणार नाही व प्रलंबित देयकामुळे कोणत्याही परिस्थितीत काम थांबवता येणार नाही.**

**३५. मक्तेदारास कामगिरी चालू असताना निर्गमित केले सर्व शासन निर्णय, कायद्यातील तरतुदी इत्यादी मा. आयुक्तसो यांचे निर्देशानुसार बंधनकारक राहतील.**

**Sd/-**
(एम.डी.पाटील)
**शहर अभियंता,**
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

**मक्तेदाराची स्वाक्षरी**

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय
## जाहिर प्रकटन क्रमांक ०७/२०१९-२०

**कामाचे नांव - मान्सुनपुर्व तयारी २०२०-२१ अनुषंगाने नियोजित मनपाच्या निवारा केंद्रामध्ये स्थलांतरीत व्यक्तींसाठी दुध, बिस्कीटे, मिल्क पावडर व शुध्द बाटली बंद पिण्याचे पाणी पुरविणे** तसेच **मान्सुनपुर्व तयारी २०२०-२१ अनुषंगाने नियोजित मनपाच्या निवारा केंद्रामध्ये स्थलांतरीत व्यक्तींसाठी चहा, नाष्टा, भोजन व पिण्याचे पाणी पुरविणे**

## अंदाजपत्रक
## आयटम रेट भरणेसाठी

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | मक्तेदाराने भरावयाचा दर र.रु. |
|---|---|---|---|
| १ | **शुध्द मिनरलयुक्त पाणी बॉटल-** | **१ लिटर बॉटल्स** | **/-प्रति नग** |
| | **दुध** | **१०० ग्रॅम पाऊच** | **/-प्रति पाऊच** |
| | दुध (मिल्क) पावडर | १०० ग्रॅम पाऊच | **/-प्रति पाऊच** |
| | बिस्कीटे गोड (पारले-जी) | १०० ते १२५ ग्रॅम पुडे | **/-प्रति पुडा** |
| | बिस्कीटे खारी (पारले-मोनॅको) | १०० ते १२५ ग्रॅम पुडे | **/-प्रति पुडा** |
| | | | |
| २ | **जेवण — (दुपारचे)** | | |
| | पुरी /चपाती /भाकरी यापैकी कोणतेही | पुरेसे / पोटभर | /- प्रति थाळी पुरेशी |
| | सुकी भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | |
| | रस भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | |
| | भात (शिजवलेला) | पुरेसे / पोटभर | |
| | **जेवण — (रात्रीचे)** | | |
| | पुरी /चपाती /भाकरी यापैकी कोणतेही | पुरेसे / पोटभर | /- प्रति थाळी पुरेशी |
| | सुकी भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | |
| | रस भाजी (फळभाजी, कडधान्य) | पुरेसे / पोटभर | |
| | व्हेज पुलाव /भात (शिजवलेला) यापैकी कोणतेही एक | पुरेसे / पोटभर | |

दिनांक - /०५/२०२०

Sd/-
(एम.डी.पाटील)
**शहर अभियंता**
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका